# महाराष्ट्रीय मंडळातील इंग्रजी माध्यमातील प्राथमिक शाळेत नियमित चालणारे क्रीडा उपक्रम व शारीरिक शिक्षणाचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्राविण्य व लक्ष कालावधी यावर होणाऱ्या परिणामांचा सर्वेक्षणात्मक अभ्यास

**आकाश झुंबर टकले**
संशोधक

**योगेश बोडके**
मार्गदर्शक
प्राध्यापक, चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, पुणे.

## गोषवारा

*प्रस्तुत संशोधनात महाराष्ट्रीय मंडळातील इंग्रजी माध्यमातील प्राथमिक शाळेत नियमित चालणारे क्रीडा उपक्रम व शारीरिक शिक्षणाचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्राविण्य, लक्ष कालावधी, चांगल्या सवयी व शिस्त यावर होणाऱ्या परिणामांचा सर्वेक्षणात्मक अभ्यास करण्यात आला. यामध्ये सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे. महाराष्ट्रीय मंडळातील इंग्रजी माध्यमातील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे लक्ष कालावधी व शैक्षणिक प्राविण्य तपासणे ही उद्दिष्टे होती. त्यासाठी महाराष्ट्रीय मंडळातील इंग्रजी माध्यमातील प्राथमिक शाळेतील एकूण १६६ विद्यार्थी हे जनसंख्या होती. त्यातील इयत्ता तिसरी व चौथीतील फक्त ॲथलेटिक्स (एन–३०) विद्यार्थ्यांची निवड हेतु पुरस्कृत पद्धतीने केली. विद्यार्थ्यांची लक्ष कालावधी कसोटी घेऊन ते शिकवताना कितपत लक्ष देऊन ऐकतात व समजून घेतात यावरून त्यांना गुण देण्यात आले व तसेच विद्यार्थ्यांचे नियमित चालणारे क्रीडा उपक्रम व शा.शि. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्राविण्य कसे आहे याची नोंद घेण्यात आली. संशोधनात मिळालेल्या महितीचे विश्लेषण करण्यासाठी संख्यात्मक आणि वर्णनात्मक सांखिकीचा उपयोग केला आहे. मिळालेल्या माहितीवरून विश्लेषणाचे अर्थनिर्वेचन करून सदर प्रकरणात निष्कर्ष व शिफारशी सादर केल्या आहेत. महाराष्ट्रीय मंडळातील इंग्रजी माध्यमातील प्राथमिक शाळेत नियमित चालणारे क्रीडा उपक्रम व शारीरिक शिक्षणाचा* विद्यार्थ्यांच्या लक्ष कालावधी व शैक्षणिक प्राविण्यामध्ये साधारणता कोणताही सहसंबंध दिसून आला नाही.

***महत्वाच्या सज्ञा :*** क्रीडा उपक्रम, शारीरिक शिक्षण, शैक्षणिक प्राविण्य, लक्ष कालावधी.

## प्रस्तावना

शारीरिक शिक्षण वेगवेगळ्या शाळांमध्ये अभ्यासक्रम राबविण्याच्या वेगवेगळ्या पद्धती आहेत त्याचा विद्यार्थ्यांच्या कौशल्यांचा जीवनभर काय परिणाम होत असेल याचा अभ्यास करणे गरजेचे आहे त्यातून विद्यार्थ्यांसाठी नवनवीन उपक्रम राबवता येतील व त्याचा फायदा विद्यार्थ्यांच्या कार्यमानावर होईल. शारीरिक शिक्षणाप्रमाणेच विविध क्रीडा उपक्रम सुरू ठेवणे तितकेच आवश्यक असते म्हणजेच क्रियाकलपामध्ये सातत्यता राहील. विविध क्रीडा उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या कौशल्यात, खेळात, सुदृढते मध्ये बदल व विकास घडवून येईल विद्यार्थ्याला त्याच्या कौशल्याप्रमाणे त्याला त्याच्या योग्य खेळात प्राविण्य मिळवता येईल. त्याचप्रमाणे त्यांचे लक्ष कालावधी व शैक्षणिक प्राविण्य यांचे उद्दिष्ट साध्य करता येईल. शारीरिक शिक्षण व क्रीडा उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या विविध बाबींवर परिणाम होताना दिसत आहेत क्रीडा उपक्रमामुळे व शारीरिक शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना अध्ययन व अध्यापन करताना शिक्षकांस मैत्रीपूर्ण, शिस्तबद्ध, सवयी त्यांच्यात होणारे बदल, शैक्षणिक प्राविण्य, शारीरिक बदल, वागणूक, लक्ष कालावधी यात बदल दिसून आला आहे. शारीरिक शिक्षण व उपक्रमांमध्ये होणारा पूर्णतः सहभाग, प्रतिसाद पालकांचा प्रतिसाद, खेळामध्ये होणारी आवड तसेच व्यायाम प्रकार उपक्रम करताना का करावे याची समज जबाबदारी त्यांना कळून आली आहे शारीरिक शिक्षण शिक्षक शिकवताना येणारा विद्यार्थ्यांचा प्रतिसाद शिक्षकासमोर शिस्तबद्ध वर्तन एखाद्या मुद्द्यावर चर्चा करताना शांतपणे ऐकून घेणे हे सर्व विद्यार्थ्यांमध्ये बदल घडून दिसत आहेत.

## उद्दिष्टे

महाराष्ट्रीय मंडळातील इंग्रजी माध्यमातील प्राथमिक शाळेत नियमित चालणारे क्रीडा उपक्रम व शारीरिक शिक्षणाचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्राविण्य, लक्ष कालावधी यावर होणारा परिणामांचा सर्वेक्षणात्मक अभ्यास.

१) विद्यार्थ्यांचे लक्ष कालावधी कार्यमान तपासणे.

२) विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्राविण्य कार्यमान तपासणे.

## संशोधन पध्दती

सदर संशोधनात संशोधकाने सर्वेक्षणात्मक पद्धतीचा अवलंब केला आहे. संशोधनात अभ्यासासाठी संशोधकाने महाराष्ट्रीय मंडळ इंग्रजी माध्यमातील शाळेतील चौथी व पाचवीच्या वर्गातील ३० विद्यार्थ्यांची हेतु पुरस्कर पद्धतीने निवड केली. शाळेतील चौथी व पाचवीच्या वर्गातील विद्यार्थ्यांवर लक्ष कालावधी

कसोटी राबवण्यात आली. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्राविण्य कार्यमान तपासण्यात आले व त्याची नोंद करण्यात आली. मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी SPSS सॉफ्टवेअरचा वापर करण्यात आला.

## विश्लेषण व अर्थनिर्वचन

**कोष्टक १.१ :** लक्ष कालावधी व शैक्षणिक प्राविण्य कार्यमान सहसंबंध

| सममितीय उपाय | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | **किंमत** | **एसिम्प्टोटिक त्रुटी** | **सुमारे टिबी** | **अंदाजे सार्थक** |
| ऑर्डिनल द्वारे ऑर्डिनल | स्पेअरमन सहसंबंध | ०९७ | .१८१ | ५१५ | .६११ |

## अर्थनिर्वचन

कोष्टक क्र. १.१ मध्ये दाखवल्याप्रमाणे लक्ष कालावधी व शैक्षणिक प्राविण्य यांच्यामध्ये सहसंबंध सहगुणक हा ०.०९७ एवढा असून त्याचा सार्थकता स्तर ०.६११ एवढा दिसून येतो. याचा अर्थ असा की लक्ष कालावधी व शैक्षणिक प्राविण्य यामध्ये सहसंबंध सहगुणक ०.०५ स्तरावर सार्थक नाही व नगण्य स्वरूपाचा आहे.

**कोष्टक क्र. १.२ :** शिक्षक श्रेणी व शैक्षणिक प्राविण्य कार्यमान सहसंबंध

| सममितीय उपाय | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | **किंमत** | **एसिम्प्टोटिक त्रुटी** | **सुमारे टिबी** | **अंदाजे सार्थक** |
| ऑर्डिनल द्वारे ऑर्डिनल | स्पेअरमन सहसंबंध | .२५६ | .१६४ | १.४०३ | .१७२ |

## अर्थनिर्वेचन

कोष्टक क्र. १.२ मध्ये दाखवल्याप्रमाणे शिक्षक श्रेणी व शैक्षणिक प्राविण्य यांच्यामध्ये सहसंबंध सहगुणक हा ०.२५६ एवढा असून त्याचा सार्थकता स्तर ०.१७२ एवढा दिसून येतो. याचा अर्थ असा की शिक्षक श्रेणी व शैक्षणिक प्राविण्य यामध्ये सहसंबंध सहगुणक ०.०५ स्तरावर सार्थक नाही व हा सहसंबंध धन पण मध्यम प्रतीचा आहे.

**कोष्टक क्र. १.३ :** शिक्षक श्रेणी व लक्ष कालावधी कार्यमान सहसंबंध

| समिमितीय उपाय | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | **किंमत** | **एसिम्प्टोटिक त्रुटी** | **सुमारे टिबी** | **अंदाजे सार्थक** |
| ऑर्डिनल द्वारे ऑर्डिनल | स्पेअरमन सहसंबंध | .१०८ | .१७७ | .५७७ | .५६९ |

## अर्थनिर्वचन

कोष्टक क्र. १.३ मध्ये दाखवल्याप्रमाणे शिक्षकाच्या श्रेणीप्रमाणे व लक्ष कालावधी कार्यमान यांच्यामध्ये सहसंबंध सहगुणक हा ०.१०८ एवढा असून त्याचा सार्थकता स्तर ०.५६९ एवढा दिसून येतो. याचा अर्थ असा की शिक्षक श्रेणी व लक्ष कालावधी यामध्ये सहसंबंध सहगुणक स्तरावर सार्थक नाही व कमी स्वरूपाचा आहे.

## चर्चा

अनेक संशोधकाच्या मते असे दिसून आले कि सकाळच्या सत्रामध्ये घेण्यात येणारे क्रीडा उपक्रम व शारीरिक शिक्षण तासांमध्ये विद्यार्थ्यांचे लक्ष कालावधी हे चांगल्या प्रकारे दिसून आले तसेच क्रीडा उपक्रम व शारीरिक शिक्षण तास झाल्यानंतर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक अभ्यासातली रुचि ही प्रभावी दिसून आली. शारीरिक शिक्षण आणि क्रीडा उपक्रम तासांमध्ये मुले लक्षपूर्वक उपक्रम करताना व अजून नवीन गोष्ट शिकण्यासाठी उत्सुक दिसून आले. त्यानंतर क्रीडा उपक्रम झाल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची भावना ही चांगल्या प्रकारे दिसून आली. आनंदाने इतर विषयांमध्ये त्यांची रुची ही वाढत गेली शरीरातील थकवा, आळस झटकून मुले आनंदाने इतर विषयांमध्ये चांगल्या प्रकारे मग्न होऊ लागली, परंतु महाराष्ट्रीय मंडळातील इंग्रजी माध्यमातील प्राथमिक शाळेत नियमित चालणारे क्रीडा उपक्रम व शारीरिक शिक्षण तासामुळे फारसा सहसंबध पडला नाही. त्यांच्या लक्ष कालावधी व शैक्षणिक प्राविण्य कार्यमानात कोणता सार्थक सहसंबंध आढळून आला नाही. परंतु नियमित चालणारे क्रीडा उपक्रम व शा.शि तासामध्ये बदल करून व विविध उपक्रम राबवून त्यांच्या मध्ये खेळाची रुचि निर्माण करून बदल केला तर विद्यार्थ्यांमध्ये येत्या पुढील काही वर्षांमध्ये सार्थक सहसंबंध आढळून येईल व त्यांचे लक्ष कालावधी कार्यमान व शैक्षणिक प्राविण्य कार्यमानात चांगल्या परिणामात वाढ दिसून येईल.

## निष्कर्ष

सदर संशोधनात खालील निष्कर्ष दिसून येतात.

१. लक्ष कालावधी व शैक्षणिक प्राविण्य कार्यमान यामध्ये नगण्य स्वरूपाचा सहसंबंध असल्याने असा निष्कर्ष निघतो कि लक्ष कालावधी कमी असणे किंवा चांगला असणे यावर शैक्षणिक प्राविण्य वाढणे किंवा कमी होणे याचा संबंध नाही, व जो आहे तो नगण्य स्वरूपाचा आहे.

२. शिक्षक श्रेणी व शैक्षणिक प्राविण्य कार्यमान यामध्ये मध्यम स्वरूपाचा सहसंबंध असल्याने असा निष्कर्ष निघतो कि विद्यार्थ्यांचे क्रीडा उपक्रम चांगले असणे किंवा चांगले नसणे यावर शैक्षणिक प्राविण्य वाढणे किंवा कमी होणे याचा संबंध नाही. व जो आहे तो धन पण मध्यम प्रतीचा आहे.

३. शिक्षक श्रेणी व लक्ष कालावधी कार्यमान यामध्ये कमी स्वरूपाचा सहसंबंध असल्याने असा निष्कर्ष निघतो कि विद्यार्थ्यांचा क्रीडा उपक्रम चांगले असणे किंवा चांगले नसणे यावर त्यांच्या लक्ष कालावधी कार्यमान वाढणे किंवा कमी होणे याचा संबंध नाही. व जो आहे तो कमी स्वरूपाचा आहे.

## शिफारशी

१. महाराष्ट्रीय मंडळातील इंग्रजी माध्यमातील प्राथमिक शाळेत नियमित चालणारे क्रीडा उपक्रम व शारीरिक शिक्षणाचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्राविण्य, लक्ष कालावधी, चांगल्या सवयी व शिस्त यावर होणाऱ्या परिणामांचा सर्वेक्षणात्मक अभ्यास हा एका वर्षाचा न करता दीर्घकालीन संशोधन करू शकतो.

२. जी लक्ष कालावधी कसोटी घेण्यात आली ती कदाचित समर्पक होती कि नाही याच्यावर सुद्धा शाशंका येते म्हणून जास्त समर्पक असणारी लक्ष कालावधी कसोटी घेण्यात यावी.

३. संशोधकांनी संस्थेच्या एकाच शाळेचा अभ्यास केला आहे याचप्रमाणे एकाच संस्थेच्या वेगवेगळ्या शाळांचा अभ्यास करता येईल.

४. अशा संशोधनामुळे शाळेतील विद्यार्थ्यांचे लक्ष कालावधी, शैक्षणिक प्राविण्य, शिस्तीत विविध उपाययोजना करण्यासाठी कार्यक्रम राबवता येईल.

## संदर्भसूची

Bailey, R. (2017). Sport, physical activity and academic achievement - towards an explanatory model. Sport in Society , 20 (7), 768-788.

Bailey, R., Armour, K., Kirk, D., Jess, M., Pickup, I., Sandford, R., & Education, BP (2009). The claimed educational benefits of physical education and school sport: an academic review. Research Papers in Education , 24 (1), 1-27.

Barbosa, A., Whiting, S., Simmonds, P., Scottini Moreno, R., Mendes, R., and Breda, J. (2020). Physical activity and academic achievement: An umbrella review. International Journal of Environmental Research and Public Health , 17 (16), 5972.

Donnelly, JE, & Lambourn, K. (2011). Classroom-based physical activity, cognition, and academic achievement. Preventive Medicine, 52, S36-S42.

Education, IP (2010). Association between school-based physical activity with school learning and academic performance.

Trudeau, F., & Shepherd, RJ (2008). Physical Education, School Physical Activity, School Sports and Academic Performance.